सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

# अध्ययन निष्पत्ती निहाय संसाधन पुस्तिका

(मसुदा प्रत)

सन - २०२३-२०२४

## विषय : मराठी

**अध्ययन निष्पत्ती निहाय संसाधन पुस्तिका इयत्ता १ ते ५**
**(प्रथम भाषा-मराठी, गणित आणि इंग्रजी) २०२३-२४**


**प्रवर्तक**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**प्रेरणा व मार्गदर्शन**
मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य
मा. सुरज मांढरे (भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा. प्रदीपकुमार डांगे (भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
मा. राहुल रेखावार (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

**निर्मिती व प्रकाशन**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**संपादक व प्रकाशक**
मा. डॉ. नेहा बी. बेलसरे
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**कार्यकारी संपादक**
श्रीमती सुवर्णा तोरणे
अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे
श्रीमती प्राची पाटील
अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे
श्रीमती वैशाली बच्छाव
अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे

**प्रथम आवृत्ती**
मार्च २०२४



# मनोगत

महाराष्ट्र राज्याने सन २०१५-१६ पासून प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक मुलाला पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त व्हावे यासाठी अनेक भरीव व परिणामकारक असे कार्यक्रम कार्यान्वित केले आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत मराठी, गणित व इंग्रजी या विषयाचे दर्जेदार असे शैक्षणिक साहित्य विकसित करून ते शाळांना वितरीत करण्यात आलेले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रामुख्याने पायाभूत साक्षरता व संख्यज्ञान विकासाची प्रक्रिया अभियान स्वरूपात पुढे नेण्याबाबत आग्रही आहे. या धोरणास अनुसरुन पुणे जिल्ह्यातही विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त व्हावे यासाठी विविध स्वरूपात प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या सुरवातीला "अध्ययन नुकसान सुधाराणात्मक कार्यक्रम" घेण्यात आला. ज्यामुळे कोविड काळात शाळा बंद असताना विद्यार्थ्यांचे झालेले अध्ययन नुकसान भरून येण्यास मदत झाली. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये निपुण क्षमता विद्यार्थ्यांना साध्य व्हाव्यात यासाठी "निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम" या ९० दिवसांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. तसेच दरमहा होणाऱ्या शिक्षणपरिषदा यामधून शिक्षकांना विविध शैक्षणिक विषयांवर सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायला हवे असेल तर वर्गस्तर आंतरक्रिया प्रभावी होणे आवश्यक असते. उपलब्ध शैक्षणिक संसाधनांचा नियोजनबद्ध वापर हा या प्रक्रियेतील कळीचा मुद्दा असतो. सद्यस्थितीत शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या साहित्याचा योग्य रीतीने व क्रमाने वापर झाल्यास प्रत्येक मुलाच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकासाचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण होऊ शकते.

अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी कोणत्या साहित्याचा वापर, कोणत्या अध्ययन निष्पत्तीसाठी करायचा, याची नेमकी माहिती शिक्षकांच्या हाताशी असण्याची गरज लक्षात घेवून सदरहू मार्गदर्शिका विकसित करण्यात येत आहे. या पुस्तिकेमुळे :

- दैनंदिन अध्ययन अध्यापनात वापरण्यासाठीचे नेमके साहित्य निवडणे सोपे जाईल.
- अध्ययन निष्पत्तीला अनुसरुन कृतींचे नियोजन करता येईल.
- आपल्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांना ज्या अध्ययन निष्पत्तीसाठी अधिक मदतीची गरज आहे त्यांच्यासाठी नेमकेपणाने पाठ्यपुस्तकातील कृतींची व साहित्याची निवड करता येईल.

अशा प्रकारे ही पुस्तिका सर्व शिक्षकांसाठी रोजच्या कामाची दिशा दाखवणाऱ्या व सतत सोबत असणाऱ्या एका विश्वासू साथीदाराचे काम करू शकते. पुणे जिल्हयातील शिक्षक व पर्यवेक्षीय अधिकारी या पुस्तिकेच्या मदतीने प्रत्येक मुलाला वयानुरूप आणि इयत्तानुरूप अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याचे आपले काम अधिक प्रभावीरित्या करू शकतील असा आम्हाला विश्वास आहे. प्रस्तुत पुस्तिका विकसित करण्यासाठी ज्या शिक्षक अध्यापकाचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील माझे सहकारी तसेच लिडरशिप फॅार इक्विटी संस्थेचे सदस्य यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्याबद्दल संस्था कृतज्ञ आहे.

**- डॉ. नेहा बी. बेलसरे**
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.

# पुस्तिकेचे स्वरुप

- **या पुस्तिकेत पुढील साहित्य संचातील साहित्याची अध्ययन निष्पत्तींशी जोडणी करण्यात आली आहे.**
    - गणिताचार्य भास्करचार्य गणित पेटी (२०१५-१६)
    - अध्ययन समृद्धी साहित्य संच (मुलभूत भाषा - गणित साहित्य पेटी २०१७-१८)
    - इंग्रजी साहित्य पेटी (२०१७-२०१८)
    - प्रगत गणित विषय समृद्धीकरण पूरक साहित्य संच (२०२२-२३)
    - अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच (२०२२-२३)
- पाठ्यपुस्तक हे एक महत्वाचे शैक्षणिक साधन आहे. त्यामुळे इतर शैक्षणिक साहित्यासोबतच त्या त्या अध्ययन निष्पत्तीसाठी पाठ्यपुस्तकातील संबंधित कृतींचे संदर्भ पृष्ठ क्रमांकासह देण्यात येत आहेत.
- सुलभ संदर्भासाठी त्या त्या साहित्य पेटीतील साहित्याचे क्रमांक व फोटो दिलेला आहे. त्यामुळे शिक्षकांना पेटीतून साहित्य सहजपणे व कमी वेळात शोधता येईल.
- काही अध्ययन निष्पत्तिसाठी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अध्ययन अनुभव देणे अपेक्षित असते. अशा प्रकाराच्या अध्ययननिष्पतिसोबत विशेष सूचनांचा समावेश केला आहे.

- **हे समजून घेऊया व लक्षात ठेवूया.**
    - प्रत्येक अध्ययन निष्पत्तीमधील कृती विद्यार्थ्यांना अचूक, सहजतेने व योग्य गतीने करता येणे अपेक्षित आहे.
    - विशेषकरून भाषा विषयाच्या विकासाची क्षेत्रे ही परस्परावलंबी व परस्परसंबंधित आहेत. म्हणून अध्ययन निष्पत्तीं क्रमाने किंवा एकानंतर दुसरी अशा शिकवणे अपेक्षित नाही. अनेक अध्ययन निषापत्तीसाठीचे अनुभव समांतररित्या देणे अपेक्षित आहे.
    - साहित्य पेट्यांमधील एका साहित्याचा उपयोग; त्याच इयत्तेच्या एकापेक्षा अधिक अध्ययन निष्पत्तिसाठी आणि एकापेक्षा अधिक इयत्तांच्या अध्ययन निष्पत्तींसाठी होऊ शकतो.

उदा. १) अध्ययन समृद्धी साहित्य संच (भाषा पेटी (मूलभूत वाचन) यामधील, चित्र गप्पा म/०३/०१/ ते म/०३/१५, २. व चित्र वर्णन म/०२/०१ ते म/०२/२२, या साहित्याचा उपयोग इयत्ता पहिली अ.नि. 'विविध उद्देशासाठी स्वतःची भाषा किंवा /आणि शाळेतील भाषेचा वापर करून गप्पा मारतात' व 'चित्रातील सुक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात' या दोन्हीसाठी होऊ शकतो मात्र साहित्याच्या मदतीने कृती देताना अध्ययन निष्पत्तीत अपेक्षित वर्तनाचा विचार करणे आवश्यक असते. हेच साहित्य इयत्ता दुसरीच्या मुलांसाठी अंदाज व्यक्त करण्याच्या संधी निर्माण करण्यासाठी वापरता येते.

- उदा. २) चित्ररूप गोष्टी वाचन (म/०७/०१ ते म/०७/२६) हे साहित्य इयता पहिलीमध्ये शिक्षकांनी चित्राच्या मदतीने गोष्ट सांगून झाल्यावर ‘ऐकलेल्या बाबींवर (गोष्ट,कविता इ.)गप्पा मारतात. आपले मत व्यक्त करतात. प्रश्न विचारतात.’ या अध्ययन निष्पत्तीसाठी तर इयत्ता पाचवीमध्ये ‘आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र इत्यादी लिहितात. कथा, कविता यांमध्ये स्वतःच्या शब्दांची भर घालून लेखन करतात.’ या अध्ययन निष्पत्तीसाठी वापरता येते.

- **एका कृतीमध्ये एकापेक्षा अधिक अध्ययन निष्पत्तिसाठीच्या अनुभवांचा समावेश असू शकतो.**

  **उदा. चित्रगप्पा ही कृती घेताना...**

  - १) विविध उद्देशासाठी स्वतःची भाषा किंवा /आणि शाळेतील भाषेचा वापर करून संभाषण करणे. उदा. माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्व अनुभव सांगणे, अंदाज व्यक्त करणे.
  - २) आपले दैनंदिन जीवन व परिसरातील अनुभवांना ऐकलेल्या गोष्टींशी जोडून गप्पागोष्टी करणे.
  - ३) चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करणे.
  - ४) चित्रातील वा चित्रमालिकातील घडणाऱ्या घटना, कृती, आणि पात्र यांना एकसंघपणे पाहून त्याचा आनंद घेणे. या चारही अध्ययन निष्पत्तिसाठीचे अनुभव देता येतात. मात्र विद्यार्थी यापैकी कोणकोणत्या गोष्टी सहजपणे करू शकतो याकडे लक्ष देणे आवश्यक असते. जिथे विद्यार्थ्याला अडचण येते तिथे सुचक प्रश्न विचारून अपेक्षित दिशेने विचार प्रवृत्त करावे लागेल किंवा गरजेनुसार अधिकचा सराव मिळण्यासाठी संधी निर्माण कराव्या लागतील.
  - पुढच्या इयत्तांमध्ये साहित्यावरचे अवलंबित्व कमी होत जाणे अपेक्षित आहे. मात्र ज्या मुलांना विशिष्ट अध्ययन निष्पत्तीमध्ये अडचणी आहेत त्यांच्यासाठी त्यांच्या स्तरानुसार साहित्याचा वापर करणे परिणामकारक ठरते.

उदा. परिसरातील 1000 पेक्षा जास्त किंमतीच्या संख्या वाचतो व लिहितो या पाचवी तील अध्ययन निष्पत्ती साठी प्रगत गणित संच या साहित्य पेटीतील कवड्या व बिट्ट्या हे साहित्य वापरण्यासाठी सुचवले आहे. मात्र वर्गातील मुले जर या साहित्यावर अवलंबून नसतील व हजार आणि त्यापुढील संख्यांची अमूर्त पातळीवर समज तयार झाली असेल तर त्या मुलांसाठी कवड्या किंवा बिट्ट्या सारखे साहित्य वापरण्याचे नियोजन करण्याची गरज नाही. मात्र वर्गात जर अशी काही मूले असतील ज्यांना कवड्या किंवा बिट्ट्या हाताळून संख्यांची समज पक्की होणार आहे तर त्यांच्यासाठी या साहित्याचा वापर व्हायला हवा.

या पुस्तिकेतील साहित्याबरोबरच आपल्या अनुभवानुसार परिसरात उपलब्ध साधने, कृतिपत्रिका, स्वाध्याय इत्यादी सहित्याचा वापर कोणत्या अध्ययन निष्पत्तीसाठी कसा करायचा हे ठरविण्यासाठीदेखील ही पुस्तिका उपयुक्त ठरेल.

# अनुक्रमणिका

## विषय : मराठी


१) इयत्ता १ ली....................................... पृष्ठ क्रमांक १ ते १४

२) इयत्ता २ री....................................... पृष्ठ क्रमांक १५ ते २८

३) इयत्ता ३ री....................................... पृष्ठ क्रमांक २९ ते ४०

४) इयत्ता ४ थी....................................... पृष्ठ क्रमांक ४१ ते ५०

५) इयत्ता ५ वी....................................... पृष्ठ क्रमांक ५१ ते ५७




# इयत्ता पहिली

**विविध उद्देशासाठी स्वत:ची भाषा किंवा /आणि शाळेतील भाषेचा वापर करून गप्पा मारतात.**
**(उदा. कविता, गोष्टी ऐकवणे. माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्व अनुभव सांगणे.)**

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

**भाग १ :** पृष्ठ १ मी व माझे कुटुंब, ५- माझी दिनचर्या, ६ स्वच्छतेसाठी कोणमदत करते, ७- चांगल्या सवयी कोणत्या, १० -ज्ञानेंद्रिये ओळख , १८ चित्रगप्पा २८,२९- घरभर प्रकाश, ४५- चित्रगप्पा ९२- तर तू काय करशील.

**भाग २ :** पृष्ठ १-पावसाचे चित्र, १७ - कमी जास्त, ३२ - नारळ, ४३-चित्र गप्पा, ७७ - पाणी साठवण्याची भांडी, ८३ पाण्याचे स्रोत, ८५, ८६ - चित्र बघ उत्तर सांग.

**भाग ३ :** पृष्ठ १ - प्राणी, ५,६ - आम्ही पाळीव प्राणी, ३७,३८ चित्रकथा ४७ - चित्र कथा, ६५,६६ - रुप नको गुण पाहा ६८- चित्रगप्पा, ८०- प्राण्यांचे स्नेहसंमेलन.

**भाग ४ :** पृष्ठ १- वाहतूक व आपले मदतनीस, ४ ते ७ वाहतुकीची साधने व प्रकार, ८,९ चित्रगप्पा आपले मदतनीस, १९ चित्र गप्पा, २१,२२- गणित गप्पा, ४०,४१- चित्रगप्पा आपले मदतनीस, ४३,४४ कोण आले मदतीला.

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८








चित्र गप्पा, (म /०१/०१ ते म/०१/०९, चित्र जुळवणे- म/०७/०१ ते म /०६,
चित्रावरून गोष्ट सांगणे म /०३/०१ ते म/०३/१५

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३


आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)


समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)


जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)


उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)





साहित्य क्र.१ ते ६, आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान , ४ यात्रा जत्रा ५ कल्पनात्मक देखावे वस्तू क्रमांक १. ते १० देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे

### बालसाहित्य (पुस्तके)

सहभागी वाचनासाठी उपयुक्त असलेली गोष्टींची पुस्तके.
(सहभागी वाचनाच्या प्रक्रियेत या अध्ययन निष्पत्ती साठी मुबलक संधी निर्माण करता येतात.)

# इयत्ता पहिली

**ऐकलेल्या बाबींवर (गोष्ट,कविता इ.) गप्पा मारतात. आपले मत व्यक्त करतात. प्रश्न विचारतात.**

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

**भाग १ :** पृष्ठ ४, ५ (कविता) पृष्ठ ८ ते ११ चित्र बघ, ऐक गप्पा मार.

**भाग २ :** पृष्ठ १ , २ झोपाळा गेला उडून (बघ ऐक व म्हण), १० कविता १७ मांजराची गंमत – चित्र बघ गोष्ट सांग

**भाग ३ :** पृष्ठ १२ कविता, १४ कविता, १७ कविता, १८ कविता,

**भाग ४ :** पृष्ठ ६ कविता, १२ गोष्ट, १३ कविता, १४ माझा भारत.

**अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८**



चित्ररूप गोष्टी वाचन म/०७/०१ ते म/०७/२६


झोपाळा गेला उडून

• बघ. ऐक. म्हण.

एका तळ्यात दोन बेडूक होते. एकदा त्यांना पाण्यात दोन खांब दिसले. त्यांनी एक वेल आणून खांबांना बांधली.

वेलीचा छानदार झोपाळा तयार झाला दोघेही बेडूक त्यावर बसून झोके घे लागले.

झोपाळा गेला उडून (बघ ऐक व म्हण)

**बालसाहित्य (पुस्तके)**

विद्यार्थ्यांच्या परिचित व आवडीच्या विषयावरील गोष्टींचा संग्रह

**मार्गदर्शक व्हिडीओ लिंक्स** https://diksha.gov.in/play/content/do_31377442194121523211481?contentType=Resource

# इयत्ता पहिली

**भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्दांसोबत खेळण्याचा आनंद घेतात. (उदा.भिंगरी, झिंगरी, इ.)**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ :** पृष्ठ ४, ५ (कविता)

**भाग २ :** पृष्ठ १० कविता

**भाग ३ :** पृष्ठ ४ शब्दखेळ शेवटी ळी येणारे शब्द लिही. १२ कविता, १४ कविता, १७ कविता, १८ कविता,

**भाग ४ :** पृष्ठ ६ कविता, १३ कविता,

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री | मान | कांत | धर | निवास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब | पु | चो | झिप | र्‍या |

मराठी/२८/०३

शब्दपट्टी वाचन २७/०१ ते २७/१२


आई, मला दे ना !

आई, मला छोटीशी बंदूक दे ना !
बंदूक घेईन । शिपाई होईन ।
ऐटीत चालीन । एक दोन तीन ।।१।।

आई, मला छोटीशी मोटार दे ना !
मोटार घेईन । ड्रायव्हर होईन ।
गावाला जाईन । पों पों पों ।।२।।

आई, मला छोटेसे विमान दे ना !
विमान घेईन । पायलट होईन ।
आकाशी जाईन । भर भर भर ।।३।।

आई, मला छोटीशी बाहुली दे ना !
बाहुली घेईन । तिजला मी सजवेन
ती संगे नाचेन । छुम छुम छुम ।।४।।

**बालसाहित्य (पुस्तके)**

बालगीते, बडबड गीते संग्रह

# इयत्ता पहिली

## लिखित आणि चित्र स्वरुपातील साहित्यातील (उदा.चित्र, आलेख इ.) यामध्ये फरक सांगतात..

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

अक्षर ओळख होण्यापूर्वीचा हा टप्पा आहे. अक्षरे/ शब्द ही एक प्रकाराची चित्रेच असतात. अक्षर ओळख करून देण्यापूर्वी विद्यार्थ्यांना चित्र व अक्षरे यातील फरक ओळखता यायला हवा. या टप्प्यावर पाठ्यपुस्तकातील चित्रे व त्यासोबत आलेला मजकूर पाहताना विद्यार्थ्यांना, ‘चित्र कुठे आहे?, चित्रांचे नाव कुठे आहे?’ असे प्रश्न विचारून या अध्ययन निष्पत्तीची खात्री करुन घेता येते.

**भाग १ :** पृष्ठ १३ व १६ ते १९ वरील 'चित्र बघ नाव सांग नाव दाखव' या कृती

**भाग २ :** पृष्ठ ५, ६ व ७ वरील 'चित्र बघ नाव सांग नाव दाखव' या कृती.

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८







वेगळा ओळखा म/०९/०१/०१ ते म/०९/०१/१५, वेगळे चित्र ओळखा म/०४/०१ ते म/०४/१५,






# इयत्ता पहिली

## चित्रातील सुक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

अक्षरांचे आकार ओळखता येण्यासाठी आकारातील छोटे छोटे फरक ओखण्याची क्षमता विकसित करणे या उदेश्यासाठी पुढील कृती उपयुक्त ठरतात.

**भाग १ :** पृष्ठ ६ ते ११ चित्र गप्पा, पृष्ठ १२ वाचन पूर्व व लेखन पूर्वतयारी * जोड्या जुळवा, १३ चित्र शब्द जोड्या जुळव, सारख्या शब्दांच्या जोड्या जुळवा भाग २ : पृष्ठ १, २ चित्रकथा, ३ चित्र वर्णन, ४ चित्रातील गंमती शोध, १६ चित्र बघ कुत्रा व मांजर काय बोलत असतील ते सांग, १७ चित्र बघ गोष्ट सांग

**भाग ३ :** पृष्ठ १, २ चित्र बघ चित्रात काय काय दिसते ते सांग. ३ *चित्र बघ आणि चव सांग, १३ चित्रांच्या आधारे शब्द साखळी पूर्ण कर, १९, २० चित्रवर्णन

**भाग ४ :** पृष्ठ –११ चित्र बघ गोष्ट तयार कर आणि सांग, १२ * हे करून बघ.

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८







चित्र गप्पा – म/०३/०१/ ते म/०३/१५, चित्र जुळवणे – म /०१/०१ ते म/०१/०९, दोन चित्रातील फरक – म/०५/०१ ते म/०५/०१/१२

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२–२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)



समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)



जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)



उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)





साहित्य क्र.१ ते ६, आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान , ४ यात्रा जत्रा ५ कल्पनात्मक देखावे वस्तू क्रमांक १. ते १० देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे

### बालसाहित्य (पुस्तके)

चित्रांची पुस्तके

# इयत्ता पहिली

**चित्रातील वा चित्रमालिकातील घडणाऱ्या घटना, कृती, आणि पात्र यांना एक संघपणे पाहून त्याचा आनंद घेतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ :** पृष्ठ ६ ते ११ चित्र गप्पा,

**भाग २ :** पृष्ठ १ , २ चित्रकथा, ३ चित्र वर्णन, ४ चित्रातील गंमती शोध, १६ चित्र बघ कुत्रा व मांजर काय बोलत असतील ते सांग, १७ चित्र बघ गोष्ट सांग

**भाग ३ :** पृष्ठ १, २ चित्र बघ चित्रात काय काय दिसते ते सांग. १९, २० चित्रवर्णन

**भाग ४ :** पृष्ठ ११ चित्र बघ गोष्ट तयार कर आणि सांग, १२ गोष्ट वाच, हे करून बघ.

**अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८**





चित्ररूप घटनाक्रम म/०८/१०/०१ ते म/०८/१०/१०, चित्ररूप गोष्टीवाचन म/०७/०१ ते म/०७/२६,






**बालसाहित्य (पुस्तके)**

चित्रकथा पुस्तके

# इयत्ता पहिली

**वाचलेल्या गोष्टी, कविता यातील अक्षरे /शब्द/वाक्य इ.ना पाहून आणि त्यांच्या ध्वनी ऐकून, समजून ओळखतात .**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ :** पृष्ठ ८, ९ माझे मित्र, २१ गोष्ट

**भाग २ :** पृष्ठ १, २ झोपाळा गेला उडून, ९ वाचन पाठ १

**भाग ३ :** पृष्ठ ११ चित्रांच्या जागी शब्द वापरुन वाच, १२, १४ , १७ , १८ वरील कविता.

**भाग ४ :** पृष्ठ ६ कविता, १२ गोष्ट , १३ कविता

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८




*** 'म' ची गंमत ***

मी, माझ्या मैत्रीणी मिनू व मितालीकडे मंगळवारी निघाले. आधी मी मिनूकडे गेले. मिनूकडे तिची मंगला मामी होती. तिने आम्हाला मूगाचे लाडू दिले. मग आम्ही मितालीकडे निघालो. मिताली मोडक्या खुर्चीवर बसली होती. मान व हात हलवून तिने आम्हांला बोलावले. मितालीने आम्हांला मक्याचे कणीस खायला दिले. माठातले गार पाणी प्यायलो. मग आम्ही मागच्या अंगणातून माडीवर गेलो. तिथे मितालीचा भाऊ माधव व त्याचे मित्र माझ्या मामाचे पत्र हरवले, ते मला सापडले हा खेळ खेळत होते.

चित्ररूप उतारे २३/०१ ते २३/०९ उतारा ३१/०१ ते ३१/०५ 'म' ची गंमत १५/०१

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



'वाचू लिहू आनंदे' लेखन पुस्तिका (वस्तू क्रमांक ६९)

साहित्य क्रमांक ३८ - अक्षर व शब्द लेखन - वाचू लिहू आनंद घटक - अक्षरे, शब्द, वाक्य व वाचन पाठ.
वस्तू क्रमांक ६९ - वाचू लिहू आनंदे लेखन पुस्तिका

## बालसाहित्य (पुस्तके)

कमी मजकूर व जास्त चित्रे असलेली बालसाहित्य प्रकारात पुस्तके

# इयत्ता पहिली

**परिसरातील छापील मजकुर व त्याचा उद्देश यांचा संदर्भाने अंदाज लावतात .उदा. वेष्टनावर लिहिलेले ओळखून गोळी/चॉकलेट चे नाव सांगणे .**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

ही निष्पत्ती परिसरातील छापील मजकुराशी संबंधित आहे. अक्षर ओळख होण्यापूर्वी मुले परिसरातील तसेच पाठ्यपुस्तकातील मजकुराचा सोबतची चित्रे व/किंवा उद्देश्य यांच्या संदर्भाने अर्थाचा अंदाज लावतात.

भाग ३ मधे पृष्ठ ३ वर चव बघ आणि शब्द जोड अशी कृती दिलेली आहे. याशिवाय पाठ्यपुस्तकातील काही मजकुराचा वापर करता येईल. उदा. प्रत्येक भागात 'पाठ्यपुस्तकात दिलेल्या प्रतिकांची ओळख' असे एक पृष्ठ सुरवातीला दिले आहे. इथे काय लिहिले असेल असे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारुन या अध्ययन निष्पत्तीसाठी अनुभव देता येतील. त्याचप्रमाणे परिसरातील मजुकराचे (सूचना, जाहिराती, निवेदने, दुकानाच्या पाट्या यांची चित्रे/ फोटो वापरता येतील)

- सांग पाहू. काय काय असेल बरे यांच्या आत?



- चित्र बघ, चव सांग.



# इयत्ता पहिली

लिखित साहित्यातील अक्षरे,शब्द आणि वाक्य यातील एक एक दिले असता ओळखतात. उदा'.माझे नाव विमल आहे.'हे कोठे लिहीले आहे ते दाखव /यात 'नाव' हा शब्द कोठे आहे./ 'नाव'या शब्दातील 'व' वर बोट ठेव.

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

अक्षर ओळख व सरावासाठी आलेल्या सर्व कृती.

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८






अक्षरगटावरील वाचनपाठ

अक्षरगट क्र.१ म क र ब घ ा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मामा | काम | बघ | मारा | राम | कर | घर |

वाक्य वाचन
१. रामा काम कर.
२. मामा काम बघ.

वाचन पाठ
१. राम बघ.
२. राम काम बघ
मामा घर बघ.
मामा काम कर.



अक्षरगट क्र.२ म क र ब घ ा ग स प व त ो ि

| | | | | |
|---|---|---|---|---|
| साप | कप | वरात | गारा | घर |
| वास | केर | वारा | मगर | कविता |
| काम | करा | बारा | काका | सविता |

वाक्य वाचन
१. काका साप बघ.
२. सविता मगर बघ.
३. कविता केक काप.
४. मामा केक घे.

वाचन पाठ
१. काका केक बघ.
काका केक घे.
२. सविता कविता कर.
सविता वरात बघ.
सविता काम कर.

समान अक्षरांची जोडी म/१८/०१ ते म/१८/५१, अक्षरगट म/१६/०१/ ते म/१६/०६

# इयत्ता पहिली

परिचित/अपरिचित मजकुरामध्ये ( उदा.मध्यान भोजनाचा तक्ता, स्वत:चे नाव, इयत्तेचे नाव, आवडत्या पुस्तकाचे नाव इ.) रस घेतात, गप्पागोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा. केवळ चित्र किंवा चित्र व मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, पूर्वानुभव आणि माहितीच्या आधारे अंदाज करणे .

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

चित्रे आणि त्यासोबतचा मजकूर पाहताना विद्यार्थी मजकुराचा अर्थ लावण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. अक्षर ओळख होण्यापूर्वी चित्र व पूर्वानुभव यांच्या आधारे व अक्षर ओळख होताना व झाल्यानंतर पूर्वानूभवा बरोबरच अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांच्या आधारे अर्थाचा अंदाज लावतात. (या अर्थ लावण्याच्या प्रक्रियेत परिस्थिती व संदर्भ यांचीही मदत घेतली जाते. ) त्या त्या टप्प्यावर विद्यार्थी असा अंदाज करुन अर्थ सांगत आहेत ना, याचे निरीक्षण करावे व गरजेनुसार सूचक प्रश्न विचारून त्यांना असा अर्थ लावण्यास उद्युक्त करावे.

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





* 'म' ची गंमत *

मी, माझ्या मैत्रीणी मिनू व मितालीकडे मंगळवारी निघाले. आधी मी मिनूकडे गेले. मिनूकडे तिची मंगला मामी होती. तिने आम्हाला मूगाचे लाडू दिले. मग आम्ही मितालीकडे निघालो. मिताली मोडक्या खुर्चीवर बसली होती. मान व हात हलवून तिने आम्हांला बोलावले. मितालीने आम्हांला मक्याचे कणीस खायला दिले. माठातले गार पाणी प्यायलो. मग आम्ही मागच्या अंगणातून माडीवर गेलो. तिथे मितालीचा भाऊ माधव व त्याचे मित्र माझ्या मामाचे पत्र हरवले, ते मला सापडले हा खेळ खेळत होते.

चित्ररूप उतारे २३/०१ ते २३/०९ उतारा ३१/०१ ते ३१/०५ 'म' ची गंमत १५/०१ म/०५/०१/१२

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३




'वाचू लिहू आनंदे' लेखन पुस्तिका (वस्तू क्रमांक ६९)

साहित्य क्रमांक ३८ - अक्षर व शब्द लेखन - वाचू लिहू आनंदे घटक- अक्षरे, शब्द , वाक्य व वाचन पाठ. वस्तू क्रमांक ६९ - वाचू लिहू आनंदे लेखन पुस्तिका

### बालसाहित्य (पुस्तके)

कमी मजकूर व जास्त चित्रे असलेली बालसाहित्य प्रकारात पुस्तके

# इयत्ता पहिली

## वर्णमालेतील अक्षरे व त्यांचा ध्वनी ओळखतात.

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

सर्वच मजकुराचे वाचन करण्यासाठी अक्षरे व स्वरचिन्हे यांचे ध्वनी ओळखता येणे आवश्यक असते. पुढे अक्षर ओळख या उद्देश्याने आलेल्या कृतीचे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.)

भाग १ : पृष्ठ १६ ते २० वरील अक्षर ओळखी साठी दिलेल्या सर्व कृती.

भाग २ : पृष्ठ ५ ते ९, ११ ते १३, १६ व १८ ते २० वरील अक्षर ओळख व सरावासाठी दिलेल्या कृती.

भाग ३ : पृष्ठ ५ ते ११ व १५

भाग ४ : पृष्ठ १ते ४, ७ व १५ ते १७

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८










शब्दचित्र गाडी १२/०१/०१ ते १२/०५/०५ चोदखडी म/१९/०१ ते म/१९/०२ अक्षरमाला म/१७/०१

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



चित्र कार्ड्स
(वस्तू क्रमांक ३९)



मुळाक्षरे कार्ड्स
(वस्तू क्रमांक ४०)



चित्र कार्ड
(वस्तू क्रमांक ४१)



शब्द कार्ड
(वस्तू क्रमांक ४२)



वर्गीकरण ट्रे
(वस्तू क्रमांक ४६)



शब्द कार्ड
(वस्तू क्रमांक ४३)



स्वरचिन्हे कार्ड
(वस्तू क्रमांक ४४)

साहित्य क्रमांक २३ – मराठी मुळाक्षरे आणि चित्रे वस्तू क्रमांक ३९, चित्र कार्ड, ४० गोल मुळाक्षरांची कार्ड रंगीत सोंगट्या आणि वर्गीकरण ट्रे साहित्य क्रमांक २५ – स्वरचिन्हे आणि शब्द वस्तू क्रमांक ४३ शब्द कार्ड, स्वरचिन्ह कार्ड

### बालसाहित्य (पुस्तके)

कमी मजकूर व जास्त चित्रे असलेली बालसाहित्य प्रकारात पुस्तके

# इयत्ता पहिली

**शाळेबाहेर आणि शाळेत (वाचन कोपरा/वाचनालय) आवडीच्या पुस्तकांची स्वत: निवड करतात आणि वाचण्याचा प्रयत्न करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**वर्गात., शाळेत परिसरात उपलब्ध असलेल्या पुस्तके आपणहून पहाणे, चाळणे, आवडीची पुस्तके निवडणे व वाचण्याचा प्रयत्न करणे या कृती विद्यार्थ्यांकडून घडणे अपेक्षित आहे.**



**बालसाहित्य (पुस्तके)**

कमी मजकूर व जास्त चित्रे असलेली बालसाहित्य प्रकारातील पुस्तके. यात कथा, कविता, चित्रकथा, विनोद, माहितीपर अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांचा समावेश असावा.

# इयत्ता पहिली

**लेखन शिकताना विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या–तिरप्या रेषा , अक्षरआकृत्या ,स्वयं–पद्धतीचे लेखन (इनव्हेनटेड स्पेलिंग) आणि स्व–नियंत्रित लेखनाच्या (परंपरागत ) माध्यमातून ऐकेलेले आणि मनातले आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात**

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

परंपरागत पद्धतीने लेखन शिकण्यापूर्वी विद्यार्थी स्वतःच्या पद्धतीने (कोणत्याही आकारात) मनातले काही लिहिण्याचा प्रयत्न करतात. याला अंकुरते लेखन असेही म्हणतात. आपण जे बोलतो ते कागदावर लिहिता येते ही जाणीव विकसित होत असते. त्याच प्रमाणे डा–वीकडून उजवीकडे लिहिले जाते, शब्दांवर रेष असते, दोन शब्दात अंतर असते ही लेखनाची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना समजत आहेत हे या कृतीमधून दिसू लागते. म्हणून लेखनपुर्व तयारीचा हा एक महत्वाचा टप्पा मानला जातो.

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८






वाचन दिशापट्टी म/०६/०१ ते म/०६/१ , मार्ग शोधा म/१०/०१ ते म/१०/०५

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२–२३



रेषा सराव पाटी
(वस्तू क्रमांक ११)



अ ते अ: स्वर सराव पाटी
(वस्तू क्रमांक १२)



'क ते ज्ञ' व्यंजन सराव पाटी
(वस्तू क्रमांक १३)

साहित्य क्रमांक ७, रेषा सराव पाटी, लेखन पूर्वतयारी साहित्य क्रमांक ८ व ९ – स्वरसराव पाटी, व्यंजनसराव पाटी

# इयत्ता पहिली

**स्वत: काढलेल्या चित्रांची नावे लिहितात (लेबलिंग) उदा. केरसुणीचे चित्र काढून त्याला 'लोटण' अस स्वभाषेतील नाव लिहिणे**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

चित्रे काढताना व रंगवताना हस्त नेत्र समन्वय व बोटांच्या हालचाली वर नियंत्रण या दोन्ही क्षमतांचा विकासाला मदत होते. त्याचे नाव स्वलिपित किंवा परंपरागत पद्धतीने लिहायला सांगावे. त्यामुळे अक्षर व चित्र यातील फरक विद्यार्थ्यांना उमजला आहे हे ही आपल्याला समजते.



# इयत्ता दुसरी

**विविध उद्देशासाठी स्वतःची भाषा किंवा / आणि शाळेतील भाषेचा वापर करून संभाषण करतात. उदा. माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्व अनुभव सांगणे, अंदाज व्यक्त करणे.**

### पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

**भाग १ - पृष्ठ ४ - चित्रवाचन, ५ माझे खेळ, १५ माहिती मिळव व सांग, १८ - का ते सांग,**
**भाग २ - पृष्ठ १ चित्रवाचन, ४ एका वाक्यात उत्तरे सांग, का ते सांग, याप्रमाणे पृष्ठ ६, ८, १०, १२, १५, वर आलेल्या सहेतुक संभाषणाच्या सर्व कृती,**
**भाग ३ - १,२ चित्रवाचन, ४ तुझ्या बाबतीत केव्हा घडले ते सांग, ६ दिनदर्शिका पाहून पुढील आठवड्यात तू काय काय करशील ते सांग, १० व २० माहिती मिळव व सांग.**
**भाग ४ -१, २ चित्रवाचन, ४ तुझ्या शाळेची माहिती जमव व वर्गात सांग, ११ का ते सांग, तर काय झाले असते सांग, १४ चांदोबाच्या पाठीवर बसून फिरायला मिळाले तर तू काय करशील, १७ सहेतुक संभाषणासाठी आलेल्या सर्व कृती.**

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





१. चित्र गप्पा म/०३/०१/ ते म/०३/१५, २. चित्र वर्णन म/०२/०१ ते म/०२/२२, ३. थीम कार्ड म/२४/०१ ते म/२४/१०

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३


आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)


समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)


जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)


उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)




साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

### बालसाहित्य (पुस्तके)

सहभागी वाचनासाठी उपयुक्त असलेली गोष्टींची पुस्तके. (सहभागी वाचनाच्या प्रक्रियेत या अध्ययन निष्पत्ती साठी मुबलक संधी निर्माण करता येतात.)

# इयत्ता दुसरी

**गप्पा, गोष्टी, कविता इ. लक्षपुर्वक ऐकतात. स्वतःच्या भाषेत सांगतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

भाग १ - पृष्ठ ६ लोभी कुत्रा, १२, १३ चतुर हिराबाई, १५ चंपकला शाबासकी मिळाली. १६, १७, १८ वडेश बहरला, ७ देवा तुझे किती, १० डिंगोरी, १४ फुलपाखरू.

भाग २ - पृष्ठ ३ हळूच या हो , ५ चिंटू रूसला, ७ भेळ, ९ पाऊस फुले, ११ एक तांबडा भोपळा, १४ झरीपाडा ,

भाग ३ - ३ चुलीवरची खीर, ७ हिवाळा, ९ संगणकाची करामत, १५ कणभर तीळ, १९ आपला भारत.

भाग ४ - ३ मंगळावरची शाळा, ५ फुलांचे संमेलन, २५ फुग्या रे, २६ मांजराची दहीहंडी, १३ चांदोबाच्या देशात, १५, १६ मोरपिसारा.

**अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८**





१. चित्र गप्पा म/०३/०१/ ते म/०३/१५,    २. चित्ररूप गोष्टी वाचन म/०७/०१ ते म/०७/२६,

**बालसाहित्य (पुस्तके)**

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी व कवितांचे संग्रह

| मार्गदर्शक व्हिडिओ लिंक | https://diksha.gov.in/play/content/do_3130581714737152001423<br>https://diksha.gov.in/play/content/do_31287635597364428812154 |
|---|---|

# इयत्ता दुसरी

**पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इ. बद्दल गप्पागोष्टी करतात आणि आपले मत व्यक्त करतात.**
**आपले दैनंदिन जीवन व परिसरातील अनुभवांना ऐकलेल्या गोष्टींशी जोडून (उदा.कथा, कविता, पोस्टर्स,जाहिरात इ.) गप्पागोष्टी करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

क्रं. ३. ही निष्पत्तीसाठी पाठ्यपुस्तकातील सर्वच गोष्टीरूप पाठ व कविता ऐकल्यावर त्यावर बोलणे व मत व्यक्त करणे अपेक्षित आहे.
क्रं. ४ च्या निष्पत्ती साठी या गप्पागोष्टी दैनंदिन जीवन व परिसरातील अनुभवांशी जोडलेल्या असणे अपेक्षित आहे. या उद्देश्याने पाठ्यपुस्तकात आलेल्या कृती :
भाग १ - पृष्ठ ५ माझे खेळ, १५ उपक्रम,
भाग २ - पृष्ठ २ खेळण्याचे दुकान, ४ एका वाक्यात उत्तरे, तर काय झाले असते?, ६ वर्गकार्य क्र. ३, ४, ५, व ६, पृष्ठ ८ पदार्थ तयार करण्याची कृती सांग, १२ काय ते सांग, १५ प्रकल्प
भाग ३ - पृष्ठ ४ वर्गकार्य क्रं ३ व ६, काम व्यवस्थित होण्यासाठी तू काय करशील?, ६ दिनदर्शिका पाहून सांग. २० उपक्रम
भाग ४ - पृष्ठ २ चित्रवाचन, ४ उपक्रम, ८ वर्गकार्य क्रं ५, ११ वर्गकार्य क्रं. ४ व ५, १७ वर्गकार्य क्रं. ५

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८






१. चित्ररूप गोष्टी वाचन म/०७/०१ ते म/०७/२६,    २. चित्ररूप घटनाक्रम म/०८/१०/०१ ते म/०८/१०/१० ,

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)   समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)   जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)   उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)

साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी व कवितांचे संग्रह

# इयत्ता दुसरी

**शब्द आणि ध्वनींच्या उच्चारांची मजा घेत लय आणि ताल असणारे शब्द तयार करतात. जसे-एक होता कावळा, जरासा बावळा.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ - पृष्ठ ९ - ऐक व म्हण शेवटच्या अक्षरांची गंमत, १८ - भूर भूर यासारखे पठातील शब्द शोधून लिही,**

**१९ - कविता पूर्ण कर,**

**भाग २ - पृष्ठ ४ शोध आणि लिही**

**भाग ३- पृष्ठ ४ शेवटचा उच्चार समान असलेल्या शब्दांची शोधून लिही, ८ कविता पूर्ण कर, १७ पाठातील गंमतीदार वाक्ये शोधून लिही, उच्चारांची गंमत**

**भाग ४- ८ उलट लिहिले तरी तसेच राहतील असे शब्द सांग, १४ शेवटच्या अक्षरासारखा उचार असलेला शब्द सांग**

**अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री | मान | कांत | धर | निवास |

शब्दपट्टी वाचन २७/०१ ते २७/१२

**बालसाहित्य (पुस्तके)**

बालकविता व गाणी यांचे संग्रह

# इयत्ता दुसरी

## स्वतःच्या कल्पनेने कथा ,कविता इ.सांगतात /ऐकवतात/पुढे नेतात.

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ - पृष्ठ-६ लोभी कुत्रा - गोष्ट पूर्ण कर, १३ गोष्ट तुझ्या शब्दात सांग, १९ कविता पूर्ण कर.**

**भाग २ -**

**भाग ३ - पुष्ठ १ चित्रातील प्राणी काय बोलत असतील ते सांग व लिही, ८ कविता पूर्ण कर,**

**भाग ४ - पृष्ठ ११ तर काय झाले असते सांग, १७ मुलगी चित्रातील वस्तूंशी काय बोलत असेल ?**

### अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





१ चित्र वर्णन म/०२/०१ ते म/०२/२२,     २. थीम कार्ड म/२४/०१ ते म/२४/१०

### अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)



समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)



जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)



उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)





साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

### बालसाहित्य (पुस्तके)

चित्र कथा संग्रह

# इयत्ता दुसरी

**आपला स्तर व आवडीनुसार कथा,कविता, चित्र, पोष्टर इत्यादीचे आनंदाने वाचन करून प्रतिक्रिया देतात. प्रश्न विचारतात**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील सर्व पाठ, (कथा, कविता, संवाद व माहितीपर उतारे) विनोद व जाहिरात यांचे वाचन आनंदाने करून त्यावर प्रतिक्रिया देता येणे व प्रश्न विचारता येणे अपेक्षित आहे. मजकुर वाचल्यानंतर त्याचे आकलन तपासणाऱ्या प्रश्नांबरोबरच, 'तुला काय वाटते?, काय आवडले?, का?' असे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना स्वतःची प्रतिक्रिया देण्यास उद्युक्त करता येते. आपले मत मांडणे, प्रश्न विचारणे यासाठी वर्गातील वातावरण मोकळे, भीतीरहित असणे आवश्यक असते. आपल्या मनातील प्रश्न योग्य भाषेत/ वाक्यात विचारता येण्यासाठी जिज्ञासेला प्रोत्साहन देऊन प्रश्न विचारण्याच्या मुबलक संधी निर्माण करणे अपेक्षित आहे.**

**अधिक सरावासाठी विशेषत: यामध्ये अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी साहित्य पेट्यातील पुढील सहित्याचा वापर करता येईल.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८







✻ 'म' ची गंमत ✻

मी, माझ्या मैत्रीणी मिनू व मितालीकडे मंगळवारी निघाले. आधी मी मिनूकडे गेले. मिनूकडे तिची मंगला मामी होती. तिने आम्हाला मूगाचे लाडू दिले. मग आम्ही मितालीकडे निघालो. मिताली मोडक्या खुर्चीवर बसली होती. मान व हात हलवून तिने आम्हांला बोलावले. मितालीने आम्हांला मक्याचे कणीस खायला दिले. माठातले गार पाणी प्यायलो. मग आम्ही मागच्या अंगणातून माडीवर गेलो. तिथे मितालीचा भाऊ माधव व त्याचे मित्र माझ्या मामाचे पत्र हरवले, ते मला सापडले हा खेळ खेळत होते.

घटनाक्रम म/०८/१०/०१ ते म/०८/१०/१०, चित्ररूप उतारे २३/०१ ते २३/०९, उतारा ३१/०१ ते ३१/०५, 'म' ची गंमत- १५/०१

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३






साहित्य क्रमांक ३८ अक्षर व शब्द लेखन - * अक्षरे शब्द वाक्य वाचन पाठ.
वस्तू क्रमांक ६९ वाचू लिहू आनंदे लेखन पुस्तिका

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी व कवितांचे संग्रह

# इयत्ता दुसरी

**चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग - १ पृष्ठ-३ फरक ओळखूया. ४ चित्र वाचन , ५ चित्र वाचन, ६ चित्र मालिका.**

**भाग २ - पृष्ठ-१, २ चित्र वाचन, ८ चित्रे पाहा, कृतीचा क्रम लिही, चित्र शब्द कोडे पूर्ण कर.**

**भाग ३ - पृष्ठ-१, २ चित्र वाचन, ११ कृती ओळखूया लिहूया, १२ एक अनेक ओळखूया.**

**भाग ४ - पृष्ठ-१,२ चित्र वाचन, १७ काय बरे म्हणत असतील?**

**अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८**









चित्र गप्पा म/०३/०१/ ते म/०३/१५, चित्र जुळवणे म /०१/०१ ते म/०१/०९, दोन चित्रातील फरक म/०५/०१ ते म/०५/०१/१२

## बालसाहित्य (पुस्तके)

चित्र कथा संग्रह

# इयत्ता दुसरी

**चित्रातील वा चित्रमालिकातील घडणाऱ्या घटना, कृती आणि पात्र यांना एकसंघपणे पाहून त्याचा आनंद घेतात .**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ - पृष्ठ- ३ चित्रामधील फरक सांग, ६ लोभी कुत्रा, चित्रकथा, ९ चित्राऐवजी शब्द, १२ चतुर हिराबाई, १३ चित्रात काय दिसते.**

**भाग २ - पृष्ठ-१, २ चित्र वाचन, ८ चित्रांचा क्रम लिही, ९ पाऊस फुले, ११ एक तांबडा भोपळा, १४ झरी पाडा.**

**भाग ३ - पृष्ठ १, २ चित्रवाचन, ३ चुलीवरची खीर, ११ कृती ओळखूया लिहूया, १५ कणभर तीळ.**

**भाग ४ - १ चित्रवाचन, भाग ४ - ३ मंगळावरची शाळा, ५ फुलांचे संमेलन, २५ फुग्या रे, २६ मांजराची दहीहंडी, १३ चांदोबाच्या देशात, १५, १६ मोरपिसारा.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





चित्ररूप घटनाक्रम म/०८/१०/०१ ते म/०८/१०/१०, चित्ररूप गोष्टी वाचन म/०७/०१ ते म/०७/२६

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३




साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे

वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

चित्र कथा संग्रह

# इयत्ता दुसरी

**परिचित/अपरिचित लिखित साहित्यात रस घेतात आणि अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात.उदा. चित्र किंवा मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, शब्द ओळखणे , पूर्वानुभव आणि माहितीचा वापर करून अर्थाचा अंदाज करणे .**

## पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

ही निष्पत्ती पाठ्यपुस्तकात आलेल्या सर्व लिखित मजकुराचा अर्थ लावण्याच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. अक्षर ओळख होण्यापूर्वी विद्यार्थी चित्र व पूर्वानूभव यांच्या आधारे व अक्षर ओळख होताना व झाल्यानंतर पूर्वानूभवा बरोबरच अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांच्या आधारे अर्थाचा अंदाज लावतात. या अर्थ लावण्याच्या प्रक्रियेत परिस्थिती व संदर्भ यांचीही मदत घेतली जाते. ही अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी लिखित मजकुरावर आधारित विविध प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे शोधताना विद्यार्थी या युक्त्यांचा वापर करतात का याचे निरीक्षण करता येते. ज्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत अडचणी येतात त्यांना सुचके देऊन या युक्त्यांचा वापर करण्यास उद्युक्त करणे आणि त्यांच्यासाठी अधिकाधिक मजकूर वाचण्याच्या संधी निर्माण करणे अपेक्षित आहे.

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८










चित्ररूप उतारे २३/०१ ते २३/०९ उतारा - ३१/०१ ते ३१/०५ 'म' ची गंमत- १५/०१

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



वैयक्तिक सवयींचे कार्ड (वस्तू क्रमांक ४८)



चित्र कार्ड्स (वस्तू क्रमांक ४९ ब)



क्रियांचे शब्द कार्ड (वस्तू क्रमांक ५६)



क्रियांचे चित्र कार्ड्स (वस्तू क्रमांक ५७ ब)

साहित्य क्रमांक २७ – सवयी वस्तू क्रमांक ४८ सवयी दोन ते तीन शब्दात लिहिलेली कार्ड, 49 त्यांची चित्रे
साहित्य क्रमांक ३१ क्रिया - * क्रियांची ओळख वस्तू क्रमांक ५६ क्रियांचे शब्द कार्ड, ५७ क्रियांची चित्रे

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी, कविता व माहितीपर सचित्र पुस्तके

# इयत्ता दुसरी

## वर्णमालेतील अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखतात.

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ - पृष्ठ ११ - अक्षरे क्रमाने लिही त्याप्रमाणे ठिपके जोड, चित्र पुर्ण कर व रंगव, १९ - खेळूया शब्दांशी**

**भाग २ - पृष्ठ ४ शोध आणि लिही, ८ चित्र शब्द कोडे, शब्द साखळी तयार कर,**

**भाग ३ - पृष्ठ ६ शब्द कोडे, ८ चिकटलेले शब्द सुटे करून पाटीवर लिही, १३ वाच आणि समजून घे, वाचूया लिहूया**

**भाग ४ - पृष्ठ ४ अक्षरे जुळवून अथपूर्ण शब्द तयार कर, ६ फुलांची नावे शोध, ७ खाली दिलेले शब्द उलट क्रमाने लिही, उलटे लिहिले तरी तसेच राहतील असे शब्द शोध व सांग. ११ अर्थपूर्ण शब्द तयार कर, १२ शब्दांची, दहीहंडी तयार कर, १४ शेवटचा उच्चार सारखा असणाऱ्या शब्दांच्या जोड्या.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





अक्षरमाला म/१७/०१, चौदाखडी म/१९/०१ ते म/१९/०२

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



चित्र कार्ड्स
(वस्तू क्रमांक ३९)



मुळाक्षरे कार्ड्स
(वस्तू क्रमांक ४०)



षट्कोनी रंगीत सोंगट्या
(वस्तू क्रमांक ४५)



साहित्यपेटीवरील वर्गीकरण ट्रे
(वस्तू क्रमांक ४६)



चित्र कार्ड
(वस्तू क्रमांक ४१)



शब्द कार्ड
(वस्तू क्रमांक ४२)



शब्द कार्ड
(वस्तू क्रमांक ४३)



स्वरचिन्हे कार्ड
(वस्तू क्रमांक ४४)

साहित्य क्रमांक २३ - मराठी मुळाक्षरे आणि चित्रे - * मुळाक्षरे आणि चित्रे जुळवणे
वस्तू क्रमांक ३९, चित्र कार्ड, ४० गोल मुळाक्षरांची कार्ड रंगीत सोंगट्या आणि वर्गीकरण ट्रे, साहित्य क्रमांक २४ - शब्द वर्गीकरण, * शब्दांचे वर्गीकरण
वस्तू क्रमांक ४१ चित्र कार्डे, ४१ शब्द कार्ड (ज्या शब्दांवर फिरकी थांबेल त्या प्रकारात बसणाऱ्या चित्रावर रंगीत सोंगटी ठेवायची)
साहित्य क्रमांक २५ - स्वरचिन्हे आणि शब्द, * स्वरचिन्हाचा योग्य वापर, वस्तू क्रमांक ४३ शब्द कार्ड, स्वरचिन्ह कार्ड

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी, कविता व माहितीपर सचित्र पुस्तके

| मार्गदर्शक व्हिडिओ लिंक | https://diksha.gov.in/play/content/do_31275318796443648017764 |
|---|---|

# इयत्ता दुसरी

**शाळेबाहेर आणि शाळेत (वाचनकोपरा/वाचनालय)**
**आपल्या आवडीच्या पुस्तकांची स्वतः निवड करुन वाचण्याचा प्रयत्न करतात .**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

पाठ्यपुस्तकातील पुढील कृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना वर्गातील/ वाचनालयातील पुस्तके वापरण्यास प्रोत्साहन देता येईल
भाग २- पृष्ठ-१२-उपक्रम - गोष्ट मिळव व वर्गात सांग
भाग ३ - पृष्ठ १० संगणकाची माहिती मिळव व वर्गात सांग, २० माहिती मिळव व वर्गात सांग




**बालसाहित्य (पुस्तके)**

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी, कविता व माहितीपर सचित्र पुस्तके

# इयत्ता दुसरी

**स्वत:च्या अथवा शिक्षकांनी ठरविलेल्या उपक्रमांतर्गत चित्रे,आडव्या- तिरप्या रेषा ,अक्षर-आकृतीच्या पुढेजावून (स्व-वर्तनीचा उपयोग) व स्व-नियंत्रित लेखन (परंपरागत ) करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**ही निष्पत्ती अक्षरांचे आकार काढता येणे व लेखनाची तांत्रिक कौशल्ये आत्मसात करण्याबाबत आहे. यात अनुलेखन व श्रुतलेखना सह सर्व लेखन कृतींचा समावेश होतो. ज्या विद्यार्थ्यांना यात अडचणी आहेत त्यांच्यासाठी अध्ययन समृद्धी साहित्य संच व मुलभूत संकल्पनांवर आधारित शैक्षणिक साहित्य संचातील पुढील साहित्य वापरून कृती द्याव्यात.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८






वाचन दिशापट्टी म/०६/०१ ते म/०६/१०, मार्ग शोधा म/१०/०१ ते म/१०/०५

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



रेषा सराव पाटी
(वस्तू क्रमांक ११)



अ ते अ: स्वर सराव पाटी
(वस्तू क्रमांक १२)

"साहित्य क्रमांक ७, रेषा सराव पाटी, लेखन पूर्वतयारी
साहित्य क्रमांक ८ व ९ - स्वरसराव पाटी, व्यंजनसराव पाटी

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी, कविता व माहितीपर सचित्र पुस्तके

# इयत्ता दुसरी

**ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वतःच्या पदधतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे चित्रे/शब्द/वाक्यातून अभिव्यक्त करतात.(लेखी)**
**आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभवांना आपल्या लेखनात समाविष्ट करतात**

## पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

*क्रमांक १५, १६ व १७ या तीनही निष्पत्ती लेखी अभिव्यक्तीची अपेक्षित वैशिष्ट्ये दर्शवणाऱ्या आहेत.

*क्रमांक १५ निष्पत्ती मध्ये ऐकलेल्या (शिक्षकांनी वाचून दाखवलेल्या) व मनातल्या गोष्टीं लेखी स्वरूपात व्यक्त करणे अपेक्षित आहे. (अनुलेखन अथवा श्रुतलेखन नाही)

* लेखी अभिव्यक्तीमध्ये जेव्हा विद्यार्थी आपल्या अनुभवांचा समावेश करतो तेव्हा १६ क्रमांकाची निष्पत्ती दिसते. म्हणून या दोन्ही अभियक्तीसाठीच्या कृती एकत्रीत दिल्या आहेत.

भाग १- पृष्ठ १३, गोष्ट तुझ्या शब्दात सांग, तुला माहीत असलेली गोष्ट सांग. १८ का ते सांग?

भाग २ - पृष्ठ ४, तर काय झाले असते? एका वाक्यात उत्तरे. (मुक्तोत्तरी प्रश्न), का ते सांग. पृष्ठ ६, प्रश्न २ ते ६, पृष्ठ १५ पाच वाच आणि लिही, पृष्ठ १८ खालील शब्द घेवून शब्दडोंगर तयार कर.

भाग ३- पृष्ठ- १ व २ चित्रातील प्राणी काय बोलत असतील ते लिही. पृष्ठ ४ प्रश्न २, ३, ५ व ६, पृष्ठ ८ रिकाम्या जागी योग्य शब्द, कविता पूर्ण कर, पृष्ठ १७ का ते लिही, पृष्ठ १८ अधोरेखित शब्द वापरुन तुझा प्रश्न लिही.

भाग ४ - पृष्ठ-१ चित्रात काय दिसते सांग व लिही, पृष्ठ ४ प्रश्न ई व उ (मुक्तोत्तरी प्रश्न) पृष्ठ ८ सांग व लिही, (पृष्ठ ११ वरील ३, ४ व ५, पृष्ठ १४ वरील प्रश्न २, ३, ७, पृष्ठ १७ वरील प्रश्न २, ३, ४ व ५ आणि काय बरे म्हणत असतील? या मुक्तोत्तरी प्रश्नाची उत्तरे लिहायलाही सांगता येतील.)

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





(या चित्रांवर गप्पा मारल्या नंतर त्याविषयी स्वतंत्र लेखन करण्याची कृती घेता येईल)
चित्र गप्पा म/०३/०१/ ते म/०३/१५, थीम कार्ड म/२४/०१ ते म/२४/१०

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १)



समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३)



जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७)



उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)





साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

# इयत्ता दुसरी

**एखादी कथा, कविता स्वतःच्या शब्दात पूर्ण करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**ही अध्ययननिष्पत्ती लेखी अभिव्यक्ती संदर्भात आहे. पाठ्यपुस्तकात मौखिक अभिव्यक्ती साठी आलेल्या पुढील कृतीं लेखनासाठी देता येतील.**

**भाग १ - पृष्ठ-६ लोभी कुत्रा-गोष्ट पूर्ण कर, पृष्ठ १९ कविता पूर्ण कर.**

**भाग २ -**

**भाग ३ - पुष्ठ १ चित्रातील प्राणी काय बोलत असतील ते सांग व लिही, ८ कविता पूर्ण कर,**

**भाग ४ - पृष्ठ ११ तर काय झाले असते सांग.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८



-चित्ररूप गोष्टी वाचन म/०७/०१ ते म/०७/२६

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १) समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३) जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७) उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)

साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान, ४ यात्रा जत्रा, ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. १. ते १० - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे (१० देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

बालसाहित्य प्रकारातील गोष्टी, कविता व माहितीपर सचित्र पुस्तके

# इयत्ता तिसरी

**सांगितली जाणारी गोष्ट, कथा, कविता इत्यादी समजपूर्वक ऐकतात व आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**पाठ्यपुस्तकातील सर्व कविता व पाठ विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात पाहणे व त्याचबरोबर त्यांना ऐकलेल्या बाबींवर प्रतिक्रिया देण्यासाठीच्या संधी निर्माण करणे अपेक्षित आहे. पाठाच्या आकलनावर आधारित प्रश्नांमधून समज तपासता येते. प्रतिक्रियेसाठी "आवडले का? काय आवडले? का? योग्य काय? अयोग्य काय? तुला काय वाटते? " अशा प्रकारचे प्रश्न विचारता येतील.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८



(इतरांनी सांगितलेली गोष्ट ऐकणे) चित्ररुप गोष्टी वाचन/०७/०१ ते ०७/०४/०७

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३




साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार, 2 समुद्र किनारा, 3 उद्यान, 4 यात्रा जत्रा 5 कल्पनात्मक देखावे, वस्तू क्रमांक 1. ते 10 घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे, (10 देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

वयोगट व वाचनस्तरानुसार कथा, कविता, नाटिका इत्यादी प्रकारातील पुस्तके

| मार्गदर्शक व्हिडिओ लिंक | https://diksha.gov.in/play/content/do_3128955951034204161532<br>https://diksha.gov.in/play/content/do_3128955951185838081148<br>https://diksha.gov.in/play/content/do_3133485344930447361998 |
|---|---|

# इयत्ता तिसरी

**गोष्टी, कविता इत्यादी योग्य आरोह-अवरोहांसह, योग्य गतीने व ओघवत्या भाषेत सांगतात.**

**ऐकलेल्या गोष्टी, कविता, विषय, पात्र, शीर्षक इत्यादींबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपली प्रतिक्रिया देतात, आपले मत मांडतात, स्वत:च्या पद्धतीने (गोष्टी, कविता इ.) स्वत:च्या भाषेत व्यक्त करतात.**

## पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक

**क्रं २ च्या अध्ययन निष्पत्तीमध्ये ऐकलेल्या गोष्टी कविता योग्य पद्धतीने सांगता येण्याची अपेक्षा आहे आणि क्रं. ३ मध्ये ते स्वतःच्या भाषेत सांगता येणे व त्यावर चर्चा करणे, प्रतिक्रिया, मत देणे व प्रश्न विचारता येणे अपेक्षित आहे. कविता, कथा व चित्रकथा स्वतःच्या भाषेत व योग्य आरोह अवरोहासह ओघवत्या भाषेत सांगण्याच्या संधी वर्गात निर्माण कराव्या लागतील. याशिवाय त्यावरील प्रतिक्रिया, मते देण्यासाठी पुढील कृती आलेल्या आहेत. अधिक समजून घेण्यासाठी, मनातल्या शंका व्यक्त करण्यासाठी प्रश्न विचारता यावेत यासाठी वर्गातील वातावरण मोकळे भीतीरहित असावे लागेल. त्याचबरोबर प्रश्न विचारण्याच्या अनेक संधी निर्माण कराव्या लागतील. भाग १ - पृष्ठ ७ म्हातारी ढगात हरभरे भरडते आहे असे का म्हटले असावे. पृष्ठ १४ रेडकाची गोष्ट तुमच्या शब्दात सांगा, भाग २ - पृष्ठ ५ तर काय झाले असते? शेरास सव्वाशेर गोष्ट वर्गात सांगा, १९ तुमच्या शब्दात सांगा, १७ प्रश्न १, २ व ३ भाग ३ - पृष्ठ २ प्रश्न क्रं १, २ व ४, पृष्ठ १५ प्रश्न ३, ४, ५ व ६ पृष्ठ १९ प्रश्न ९ भाग ४ - पृष्ठ ९ प्रश्न २, ३ व ४, पृष्ठ १८ प्रश्न २ मधील ई आणि उ.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८



चित्ररुप गोष्टी वाचन/०७/०१ ते ०७/०४/०७

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३



आठवडी बाजार देखावा कार्ड (वस्तू क्रमांक १) समुद्र किनारा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ३) जत्रा देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ७) उद्यान देखावा कार्ड (वस्तू क्रमांक ५)

साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान , ४ यात्रा जत्रा ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. 1. ते 10 - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे, (10 देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

वयोगट व वाचनस्तरानुसार कथा, कविता, नाटिका इत्यादी प्रकारातील पुस्तके

# इयत्ता तिसरी

**आपल्या परिसरात घडणारे प्रसंग/घटना आणि भिन्न परिस्थितींत आलेले स्वत:चे अनुभव व्यक्त करतात, त्याविषयी चर्चा करतात आणि प्रश्न विचारतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**भाग १ - पृष्ठ ७ खालील कामे करण्यासाठी तुझ्या घरात कोणत्या वस्तू वापरतात? पावसात भिजल्यावर तुम्हाला काय वाटते? १७ तुम्हाला कोणत्या गोष्टींकडे एक टक पाहावेसे वाटते? २४ उपक्रम ४, भाग २ - पृष्ठ ६ चित्रातील व्यक्ती एकमेकाशी काय बोलत असतील?, ७ संवाद साधा, माहिती वर्गात सांगा, १५ विचार करा सांगा व लिहा, १७ प्रसंग वाचा, उपाय सुचवा, १९ प्रश्न १, ३ व ४, पृष्ठ २१ चित्रे पाहा वर्णन करा. भाग ३- पृष्ठ ५ प्रश्न ४ व ५, पृष्ठ ६ आम्ही आमचे अनुभव लिहितो, भाग ४ - पृष्ठ २ प्रश्न ५, पृष्ठ १५ प्रश्न ९ व १०, पृष्ठ १८ प्रश्न ४**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८





चित्र गप्पा /०३/०१ ते म/०३/१५, थीम कार्ड म / २४/०१ ते म /२४/१०

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३




साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार , २ समुद्र किनारा, ३ उद्यान , ४ यात्रा जत्रा ५ कल्पनात्मक देखावे
वस्तू क्र. 1. ते 10 - घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे, (10 देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

| मार्गदर्शक व्हिडिओ लिंक | https://diksha.gov.in/play/content/do_3133485344930447361998 |
|---|---|

# इयत्ता तिसरी

**गोष्टी, कविता किंवा इतर साहित्यप्रकार समजून घेऊन त्यांत स्वतःच्या माहितीची भर घालतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

*** दिलेला विषय, चित्रे किंवा मुद्दे यावरून गोष्ट किंवा कविता सांगताना अथवा लिहिताना विद्यार्थी त्यामधे स्वतःची भर घालत आहेत ना हे जाणीवपूर्वक पाहाणे व त्यासाठी उद्युक्त करणे महत्त्वाचे आहे. भाग १ - पृष्ठ २ चित्रावरून गोष्ट सांगा, १४ प्राण्यांशी गप्पा मारत आहात असा संवाद सादर करा, १७ पानांवरच्या शिरा पाहून नदी बद्दल माहिती सांगण्याची कल्पना मनुलीला सुचली तशी तुम्हाला नदी बद्दल माहिती सांगण्यासाठी कोणती कल्पना सुचते ते सांगा, २० आम्ही कविता करतो भाग २ - पृष्ठ २ कवितेच्या ओळी पूर्ण करा, ११ गोष्ट पूर्ण करतो, २१ आम्ही पुस्तक बनवतो . भाग ३- पृष्ठ १६ आम्ही चित्रावरून गोष्ट लिहितो, १९ कल्पना करुन लिहा २३ चित्रांचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा. भाग ४- पृष्ठ ८ मुलाखत घ्या.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८



चित्ररुप गोष्टी वाचन/०७/०१ ते ०७/०४/०७

## अभ्यासक्रमातील मुलभूत संकल्पनावर आधारित शैक्षणिक साहित्य संच २०२२-२३




साहित्य क्रमांक १ ते ५ - आठवडी बाजार, 2 समुद्र किनारा, 3 उद्यान, 4 यात्रा जत्रा 5 कल्पनात्मक देखावे, वस्तू क्रमांक 1. ते 10 घटक - देखावा बनवणे, चित्र गप्पा, चित्रावरून गोष्ट तयार करणे, (10 देखावे कार्ड्स व अंक कार्ड्स चिटकवण्यासाठी काळी पाटी.)

## बालसाहित्य (पुस्तके)

वयोगट व वाचनस्तरानुसार कथा, कविता, नाटिका इत्यादी प्रकारातील पुस्तके

| मार्गदर्शक व्हिडिओ लिंक | https://diksha.gov.in/play/content/do_3133485344930447361998 |
|---|---|

# इयत्ता तिसरी

**विविध साहित्यप्रकार/लेखनप्रकार (बालसाहित्य) समजपूर्वक वाचून त्यांवर आधारित प्रश्न विचारतात, स्वत:चे मत व्यक्त करतात, शिक्षक, मित्र यांच्याबरोबर चर्चा करतात, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तोंडी व लेखी स्वरूपात देतात.**

**पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक**

**पाठ्यपुस्तकात विविध साहित्य प्रकारातील पाठांचा समावेश आहे. या पाठाखालील स्वाध्यायात आलेले आशयाचे आकलन तपासणारे प्रश्न. एका वाक्यात / दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा, गाळलेल्या जागा भरा, जोड्या जुळवा इत्यादी मधून या अध्ययन निषपत्तीसाठी भरपूर संधी मिळतात. मात्र अधिक समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना नेमके प्रश्न विचारता यावेत यासाठी प्रश्न जाणीवपूर्वक संधी निर्माण करण्याची गरज असते.**

## अध्ययन समृद्धी साहित्य संच २०१८




